ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– I Jan – Feb, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# नॅशनल असोससएशन फॉर द ब्लाइंड युननट महाराष्ट्र या संस्थेच्या दृष्ष्टबाधधतांच्या पुनर्वसन कायावतील योगदानाचा अभ्यास

* भारती आनंदराव पाटील

** प्राचार्य डॉ. चंद्रकांत एम. बोरसे

केंद्र:मविप्र समाजाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक

**सारांश :**

भारताच्या महासत्ताक होण्या मध्ये भारताचा सर्वांगाने विकास होण्यासाठी नॅब ही संस्था दृष्टि बाधित, कर्णबधिर, अंध आणि बहुविकलांग प्रवर्गासाठी काम करीत आहे. शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, वैद्यकीय पुनर्वसन,शैक्षणिक पुनर्वसन, आर्थिक पुनर्वसन, कौटुंबिक पुनर्वसन व सामाजिक पुनर्वसन या माध्यमातून दिव्यांगांच्या पुनर्वसना संदर्भात नॅब संस्था कार्य करीत आहे. यामध्ये सन 2021-22 च्या जनगणनेनुसार दृष्टबाधित लोकांच्या जनगणनेत दृष्टीबाधित प्रवर्गाची संख्याही फार मोठी आहे. दृष्टिबाधितांची भारतातील आकडेवारी सांगायची झाल्यास 50,32,463 इतकी आहे त्यात दृष्टीबाधित पुरुषांची संख्या 26,38,546 तर महिला दृष्टिबाधितांची संख्या 23,93,947 इतकी आहे. तसेच दृष्टीबाधितांची महाराष्ट्रातील संख्या 5,74,052 इतकी असून त्यात ग्रामीण भागात 3,21,266 दृष्टीबाधित तर शहरी भागात 2,52,786 इतकी आहे. निसर्गाकडून मोफत मिळालेल्या गोष्टीचे महत्त्व म्युकर मायकोसिस सारख्या आजारांच्या निमित्ताने नागरिकांना नव्याने समजू लागले आहे. मात्र अद्यापही दृष्टीअभावी अंधाराच्या सृष्टीत जगणाऱ्या दृष्टिबाधितांची संख्या महाराष्ट्रात तसेच केवळ नाशिक जिल्ह्यात 2021 दृष्टीबाधितांच्या जनगणनेतच तब्बल वीस हजारांच्या ही पार गेली आहे आणि ही अतिशय गंभीर बाब आहे. या संदर्भात या गंभीर मुद्द्यावर नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंडने प्रकाश टाकताना नेत्रदानाच्या चळवळीला प्रोत्साहन देण्याची गरज अधोरेखित केली. दृष्टीबाधित होण्याच्या समस्येचे व्यापक स्वरूप लक्षात घेता न्याप संस्थेच्या माध्यमातून शहर व जिल्ह्यात तसेच राज्यात दृष्टी बाधितांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. दृष्टीबाधित समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची शैक्षणिक प्रगती सुद्धा तेवढीच महत्त्वाचे आहे या सर्व गोष्टींचा फक्त विचार न करता कार्यात्मक दृष्टीने ठोस पावले उचलण्याची गरज आहे व सहकार्य करणाऱ्या हातांची गरज आहे अंधांच्या उत्थानासाठी जगभरात व भारतात अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यातीलच नॅब ही अग्रणी संस्था आहे. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड युनिट महाराष्ट्र ही संस्था दृष्टिबाधितांच्या जीवनात रंग भरण्याचे काम करते. म्हणजेच नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

युनिट महाराष्ट्र या संस्थेने आजतागायत अनेक दृष्टबाधितांना स्वयंपूर्ण होण्यासाठी मदत केली आहे. आजही दृष्टिबाधित प्रवर्गात

त्यांच्या कुटुंबीयांना तसेच समाजाला एक भार वाटतो, एक ओझे वाटते, ही त्यांची मानसिकता बदलण्याची जबाबदारी नॅब सारख्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती घेत आहेत. कारण अशा संस्था दृष्टिबाधित प्रवर्गाच्या दृष्टीने आज एक गरज बनल्या आहेत. नॅब संस्था म्हणजे दृष्टीबाधितांचा श्वास आहे. दृष्टिबाधित प्रवर्गाचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक पुनर्वसन करून त्यांना सशक्त व सक्षम करण्यासाठी 1 जून 1984 ला नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड युनिट महाराष्ट्र ही राज्य शाखा नाशिक येथे स्थापन करण्यात आली. नॅबसारख्या संस्थांनी दृष्टीबाधित प्रवर्गाला पुनर्वसन करण्यासाठी जी पावले टाकली आहेत त्याचे ज्ञान समाजाला करून देण्याच्या होणे गरजेचे आहे. दृष्टि बाधितांचा सर्वांगीण विकास साधने त्यांचे सक्षमीकरण करणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून न्याय संस्था शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून योगदान देत आहे. दृष्टिबाधितांचा शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक, शारीरिक, भावनिक, मानसिक इत्यादी गुणांचा विकास व्हावा यासाठी संस्था अहोरात्र परिश्रम घेत आहे, आज भारताच्या कानाकोपऱ्यात शेकडो यशस्वी दृष्टिबाधित प्रवर्ग या संस्थेमुळे यशस्वीपणे सामाजिक बांधिलकी राखून समाजातील विविध क्षेत्रात यशस्वी काम करीत आहे. याचे श्रेय न्याप संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाला जाते विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमातून दृष्टि बाधितांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करते आहे प्रवर्गाला फक्त शिक्षण देणे एवढा विचार न करता दृष्टीबाधितांना स्वतःच्या पायावर उभे करून यशस्वी शिखरापर्यंत पोहोचविण्यासाठी नॅब संस्था त्यांना मदतीचा हात देते. विविध क्षेत्रात मानसन्मान प्रतिष्ठा मिळवून देणे, पर्यायाने दृष्टीबाधित प्रवर्गाचे सक्षमीकरण करणे हा मुख्य उद्देश नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड युनिट महाराष्ट्र या संस्थेचा आहे. तसेच समाजाला दृष्टी बाधित प्रवर्गाच्या समस्यांच्या प्रश्नांची जाणीव करून देणे ही आजच्या काळाची गरज आहे. नॅब युनिट महाराष्ट्र नाशिक या संस्थेची गेल्या 38 वर्षांची वाटचाल लक्षात घेतली तर संस्थेच्या संस्थापकांपासून आत्तापर्यंत झालेले पदाधिकारी, कर्मचारी, सभासद, देणगीदार, शासकीय स्तरावरील अधिकारी, समाजकल्याण विभागाचे अधिकारी अशा अनेकांचा सहभाग डोळ्यासमोर येतो. आणि एक मोठे चित्र साकार झाल्याचे लक्षात येते. किती जणांनी हे चित्र पूर्ण व्हायला आपलं योगदान दिलं, कुणी रेषा आखल्या, कुणी रंग भरले, कुणी चित्राची पार्श्वभूमी तयार केली, कुणी आकाश साकारलं, कोणी हिरवाई साकारली यातून समाजातील दानशूर वर्ग, हितचिंतक व संस्थेचे सर्व कार्यशील घटकांमुळे खूप काही चांगलं उभं राहिलं. अंध मुलामुलींसाठी निवासी शाळा, शालेय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, प्रौढ अंध व्यक्तींसाठी प्रशिक्षण कार्यशाळा तसेच प्रौढ अंध व्यक्तींसाठी स्वयंरोजगार, रोजगार प्रशिक्षण देणारी प्रशिक्षण केंद्रे संस्थेने सुरू केले. नवीन तंत्रज्ञानाला अनुसरून संगणक प्रशिक्षण केंद्र राज्यातील ठिकठिकाणच्या जिल्हा शाखांमध्ये उभे राहिले. अंधत्वा बरोबरच इतर अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी बहुविकलांग पुनर्वसन केंद्र नॅब युनिट महाराष्ट्र नाशिक येथे निर्माण झाले. दृष्टीबाधितांसाठी वृद्धाश्रम, दिव्यांग क्षेत्रात तज्ञ प्रशिक्षित शिक्षक निर्माण व्हावेत म्हणून विशेष शिक्षण देणारे डीएड, बीएड अभ्यासक्रम मुक्त विद्यापीठाच्या सहकार्याने संस्थेने सुरू केले. हे सर्व सहज साध्य व्हावे म्हणून विविध शिष्यवृत्ती, शैक्षणिक साधन सामग्री संस्थेमार्फत उपलब्ध करून दिली जाऊ लागली. अभ्यासाबरोबर इतर विषयांचे वाचन लेखन करता यावे म्हणून ॲमवे कंपनीच्या सहकार्याने

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– I Jan – Feb, 2023

OPEN ACCESS Original Research Article

बोलक्या पुस्तकांच्या आणि ब्रेलमधील छापील पुस्तकांची लायब्ररी सुरू करण्यात आली. तसेच दृष्टिबाधित प्रवर्ग क्षेत्रात राज्यातील अंध व बहुविकलांग विद्यार्थी- विद्यार्थिनींना जे दहावी बारावी बोर्डात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण व पदवीधर झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी, अंधांसाठी कार्यरत संस्था, अंध-अपंग क्षेत्रात विशेष कार्य कर्तृत्व करणारे व्यक्तिमत्व गाजवणारे राज्यातील चार विशेष शिक्षक व एक प्राध्यापक यांना नॅब संस्थेमार्फत दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या सर्व उपक्रमांना आर्थिक पाठबळ मिळावे म्हणून निधी संकलन हा देखील विभाग संस्थेने स्थापन केला. नॅब चॅरिटी सेंटर, ध्वजदिन निधी, शहरात ठीकठिकाणी दानपेट्या यामार्फत निधी संकलित केला जातो. नॅब संस्थेची धुरा जबाबदारीने व यशस्वीपणे सांभाळत संस्थेला यशोशिखरावर नेण्याचे काम नॅबचे सर्व पदाधिकारी, अधिकारी व नॅबमध्ये कार्यरत कर्मचारी करीत आहेत. संस्थेने शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे योगदानातून दृष्टिबाधित प्रवर्गाचे सक्षमीकरण केले आहे.

**प्रस्तावना:**

भारतीय संविधानाने 86 व्या घटना दुरुस्तीत सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुला मुलींना मोफत व सक्तीचे आठवीपर्यंत शिक्षण देणे ही शासन व समाजाची जबाबदारी असून ते मिळवणे मुला मुलींचा मूलभूत हक्क आहे हे मान्य केले आहे सर्व मुला मुलींना शिक्षण याचा अर्थ अंध अपंग मुला-मुलींना सुद्धा शिक्षणाच्या प्रवाहाताने क्रमप्राप्त आहे योग्य शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा जन्म सिद्ध हक्क आहे हे जगन मान्य सत्य आहे म्हणूनच प्रत्येक अंध मुलाचाही तो जन्मसिद्ध हक्कच आहे. दृष्टी बाधितांना मिळालेले योग्य प्रकारचे शिक्षण त्याला आपल्या अंधत्वावर मात करायला शिकविते भारतीय संविधानातील नियमानुसार देशात प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे तसेच अंध अपंग व्यक्तींना समान संधी त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या संपूर्ण सहभाग या उद्देशाच्या पूर्ततेसाठी सन 1995 मध्ये भारत सरकारने अपंग व्यक्ती समान संधी हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग अधिनियम 1995 हा अपंगांसाठी सर्वसमावेशक कायदा संमत केला होता असे असूनही शिक्षण व विकास संधीच्या बाबत भारतातील अंध अपंग व्यक्तींच्या एकूण लोकसंख्येच्या किमान 20 टक्के मुलांना सुद्धा या शैक्षणिक योजनांचे व कायद्याचे फायदे मिळत नाही ही वास्तविकता आहे शिक्षणाच्या बाबतीत सर्व मुलांना एकसमान शिक्षण संधी उपलब्ध करून देण्याबाबत आपला देश नेहमीच कटिबद्ध आहे. असे असूनही देशातील अपंगांच्या शिक्षणाचा मार्ग आजही खडतर आहे या निराशा जनक परिस्थितीचे अनेक कारणे सांगता येतील अंध अपंगांची समाजाकडून हे टाळणे होते व त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंडाची भावना निर्माण होते अंध अपंगांना शिक्षण मिळाल्यामुळे समाजाचाच फायदा होतो यावर समाजाचा अजूनही विश्वास नाही त्यामुळे पालक त्यांच्या शिक्षणासाठी पुरेसा पैसा खर्च करण्यास तयार नसतात पालकांना व बालकाला योग्य मार्गदर्शन मिळत नाही अंध अपंगांसाठी असणाऱ्या सोयी सुविधांविषयी समाजात अजूनही अज्ञान आहे ही दिव्यांग मुलेही आत्मनिर्भर होऊ शकतात याबाबतच समाजात साशंकता आहे त्यामुळे त्यांच्यासाठी वेळ व पैसा खर्च करणे व अतार्किक समजले जाते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– I Jan – Feb, 2023

OPEN ACCESS Original Research Article

भारतीय समाजातील अंध अपंगांचे स्वरूप बदलण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे म्हणूनच संविधानात शासनावर आले

आहेत कलम 46 नुसार सर्व दुर्बल घटकांसाठी म्हणजेच त्यात अंध अपंगांसाठी ही विशेष योजना आहेत शिक्षण शुल्कात सवलत किंवा शुल्क माफी शैक्षणिक साधनांचे मोफत वाटप निवासी शाळांची सोय दत्तक पालक योजना अपंगांच्या शिक्षणासाठी विशेष शाळांची सोय आणि सर्वसमावेशक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे. भारतीय राज्यघटनेनुसार नागरिकांना काही अधिकार बहाल केले गेले तसेच काही जबाबदाऱ्याही सोपविण्यात आल्या आहेत. त्यानुसार कायदे तयार केले गेले प्रत्येक भारतीय नागरिक संविधानाशी बांधिल राहून दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याला बाधा न आणता नियमांना निर्देशक तत्त्वाचा कायदा समजून आचरण ठेवील याची तरतूद करण्यात आली आहे. हे कायदे प्रत्येक नागरिकाला बंधनकारक असतील. त्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाच्या दृष्टीने अंध-अपंग व्यक्तींना शिक्षण उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट गाठताना केवळ वचनबद्धता पुरेशी नाही. त्यासाठी दिव्यांगांच्या गरजा ओळखून त्याप्रमाणे सोयी सुविधा देण्याबरोबरच दिव्यांगांसाठी भेदाभेदाच्या अडथळयांपासून मुक्त असे सामाजिक व शैक्षणिक वातावरण आपल्या देशात तयार होणे आवश्यक आहे. यासाठी दिव्यांगाना सर्वसमावेशक अशी शिक्षण संधी या संकल्पनेवर आधारित योजनेचा आराखडा तयार करणे, योजनेचे ध्येय, दिशा, कृती आराखडा ठरवण्याबरोबरच आवश्यक संसाधनांचे वाटप त्यासंबंधी आवश्यक कायदेशीर तरतुदी व नियम तयार करणे महत्त्वाचे ठरते.

महान शास्त्रज्ञ अल्बर्ट यांना दिसले आजार होता तरीही त्यांनी विश्वाकडे पाहण्याचा आणि त्यांचे गुड समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरलेला सापेक्षता वादाचा सिद्धांत जगाला दिला थॉमस अल्वा एडिसनला नीट ऐकू येत नव्हते पण याच शास्त्रज्ञाने विजेचा शोध लावला त्याचा हा शोध आजच्या आधुनिक जग आकाराला आणण्यासाठी इतर कशापेक्षाही अधिक महत्त्वाचाच ठरला आहे. लुईस ब्रेल दृष्टीहीन होता पण त्याने शोधून काढलेल्या ब्रेल लिपीमुळे जगभरातील अंध व्यक्तींना वाचण्या लिहिण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकली हे प्रतिनिधिक उदाहरण पाहिल्यानंतर काय लक्षात येते या व्यक्ती अशा आहेत ज्यांनी हे सिद्ध केले आहे की अंगात गुण असतील तर अपंगत्वावर सहजतेने मात करता येऊ शकते. एक काळा असा होता जेव्हा अपंगत्व म्हणजे त्या व्यक्तीला आणि त्याच्या कुटुंबाला मिळालेला शाप मानला जाईल मागच्या जन्मीच्या पापाचे फळ म्हणून त्याकडे पाहिले जाईल परंतु आधुनिक विज्ञानामुळे हे गैरसमज आता दूर झाले आहेत वैद्यकीय उपचाराद्वारे अपंगत्वावर मात करता येऊ शकते हे सत्य आता लोक स्वीकारू लागले आहेत विज्ञान आणि नवनव्या शोधामुळे अपंगत्वावर मात करण्यासाठीची साधने उपलब्ध आहेत ज्यामुळे शारीरिक विकलांग व्यक्तींचे जीवन अधिक सुसह्य झाले आहे.

माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाची साथ लाभल्यामुळे राष्ट्र उभारणीच्या कार्यास हातभार लावण्याची शक्ती दिव्यांग नागरिकांना प्राप्त झाली आहे दिव्यांगाना अडचणी आणि अडथळे विरहित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी आणि

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– I Jan – Feb, 2023

OPEN ACCESS Original Research Article

त्यांना स्वावलंबी स्वतंत्र आयुष्य जगता यावे यासाठी शासनाबरोबरच न्याप सारख्या स्वयंसेवी संस्थांमार्फत ही प्रयत्न केले जात आहेत. दृष्टीने विकलांग असलेली मुले काम करू शकत नाहीत उपजीविकेसाठी काही कमावू शकत नाही शकणार नाहीत म्हणून त्यांना घरीच बसवून सुरक्षित ठेवण्यात यावी हा पारंपारिक विचार बदलण्यासाठी अंध अपंगांना शालेय शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे या व्यक्ती जर शिक्षणापासून वंचित राहिलीत तर देशाचे निश्चितच सामाजिक नुकसान होईल दृष्टीत बाधित प्रवर्गाला स्वतःची लिपी लिहिता वाचता आली तसेच त्यांचे शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसन झाले तर ते समाजाचे उपयुक्त घटक खास होतील वस्तुतः जन्मभर बांडगूळ म्हणून दुसऱ्याच्या दयेवर लाचारीने जगावे लागणे यासारखी वाईट गोष्ट नाही व यालाचारीच्या नियुक्तीच्या भावनेचा भार दिव्यांगांच्या मनावर इतका असतो की त्यांच्या मनाला मोकळेपणात वाटत नाही चार चौघात वाघाची चोरी पंगूपणाची लाज त्यामुळे कदाचित ही मुले अंधशाळेत किंवा बहु विकलांगांच्या शाळेत अधिक समाधानी असतात पण हे समाधान खोटे आहे समदुखावर आधारलेले आहे ज्यावेळी त्यांच्या पंगोपणाने निर्माण होणारी न्यूनता घालवणारी शिक्षण त्यांना मिळेल तेव्हाच हा प्रश्न सुटेल या अंध अपंग मुलांचा प्रश्न इतका कठीण झाला आहे याचे एकच कारण आहे आणि ते म्हणजे त्यातील काही दुर्दैवी मुलांना ज्ञानाचे दरवाजे अजूनही उघडून दिलेले नाहीत हाताच्या बोटांमध्ये केवळ केवढे कौशल्या साठवलेले आहे याची कल्पनाच दिलेली नाही निसर्गाचे सौंदर्य जीवनाची भव्यता व जगण्याची गोडी त्यांना पटवून दिलेली नाही याकरिता अंध अपंगांच्या अधिक शाळा अधिक संस्था अधिक औद्योगिक केंद्रे, शिक्षण केंद्र, व्यावसायिक केंद्रे,, प्रशिक्षण केंद्रे यांची गरज आहे. ही गरज समाज व शासन यांनी भागवली पाहिजे. कारण अंध अपंगांना मिळणाऱ्या वागणुकीवरच समाजाची संस्कृती मोजली जाते. धडधाकट माणसांना चांगली वागणूक मिळते कारण ती न मिळाल्यास ते प्रतिकार करू शकतात. पण जे रंजलेले आहेत जे गांजलेले आहेत त्यांना आपलेपणाने वागावणारा जवळच धर्म राहू शकतो देव राहू शकतो. परंतु हे सर्व व्यवस्था पश्चादुिपचारासारखी आहे चूक करून निस्तरण्यासारखी आहे मुले अंध अपंग न होतील याकरिताच समाजाने काळजी घेतली पाहिजे प्रसूतीपूर्वक काळजी अर्भकांची स्वच्छता आरोग्य व संसर्गजन्य रोगांचा प्रतिकार, अंधश्रद्धा निर्मूलन त्वरित व्हायला हवेत. नेत्रोपचार केंद्रांसारखी केंद्रे समाजात फुगडायला हवीत परंतु हे सर्व प्रतिकारात्मक प्रयत्न करून सुद्धा अपघात किंवा निसर्ग कोप यामुळे येणारी अपंगता राहीलच या सर्व अपंगांच्या समोर हेलन केलर, लुई ब्रेल, डॉक्टर सुबोधचंद्र रॉय, उद्योजक भावेश भटिया, आय.ए. एस. अधिकारी प्रांजल पाटील यांची उदाहरणे ध्येयदर्शी ताऱ्यांप्रमाणे आहेत. अंध अपंगांना शिक्षण देऊन त्यांना समाजाचे उपयुक्त घटक बनविणे ही एक सामाजिक जबाबदारी आहे व ती स्वीकारलीच पाहिजे आजही अंधाभंग पाल्य त्यांच्या कुटुंबीयांना तसेच जेसमाजाला एक भार वाटतो एक ओझं वाटतं ही त्यांची मानसिकता बदलण्याची जबाबदारी नॅब सारख्या संस्था व त्या संस्थांमध्ये काम करणारे व्यक्ती घेत आहेत. कारण अशा

संस्था अंध अपंग व्यक्तींच्या दृष्टीने गरज बनल्या आहेत.

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड इंडिया थोडक्यात नॅब इंडिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थेची स्थापना 1951 मध्ये मुंबई येथील क्रिकेटर विजय मर्चंट यांनी मुंबईत केली. याचे कारण भारतात अंधत्वाचे प्रमाण जास्त होते. या अंधत्वावर मात करण्यासाठी या संस्थेची स्थापना झाली. डॉक्टर अल्पाइन वाला डॉक्टर बॉस डॉक्टर मर्चंट यांच्या सहकार्याने वरळी येथे न्याबला जागा मिळाली या संस्थेत अंध बंधू-भगिनींना विविध सेवा पुरविल्या जातात नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड राष्ट्रीय मुख्यालय मुंबई येथे आहे देशाच्या इतर भागातील लोकांसाठी नॅब सेवांचे जाळे सर्वत्र पसरविण्यासाठी मुंबई बाहेर राज्यस्तरीय कार्यालय स्थापन करणे गरजेचे होते इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्राने देखील अंधत्व निवारण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत निव्वळ शासनावर अवलंबून न राहता एनजीओ अंधांसाठी मदत करतात अंधप्रवर्गाचे पुनर्वसन केले जाते त्यामुळे ही संस्था देशातील अंध लोकांचा श्वास बनली आहे या संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या अंधप्रवर्गाचे शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसन केले जाते शिक्षणाबाबत जनजागृती निर्माण केली जाते महिलांसाठी शालेय शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे शिक्षणामुळे अंधांची जीवन सुखकर होते अंधमुली शिक्षणात आल्या पाहिजेत यासाठी मॅप सतत प्रयत्नशील आहे. संस्थान दृष्टि बाधित महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष कार्य करते विविध कल्याणकारी योजना शिष्यवृत्ती निवासी शाळा या महिलांना प्रदान करून दृष्टी बाधित मुलींना शिक्षणाच्या तसेच त्यांच्या पुनर्वसन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. दृष्टीबाधित महिलांना संस्थेमार्फत व्यावसायिक शिक्षण तसेच कौशल्याधारित शिक्षण, संगणक प्रशिक्षण, पाककला संगीत, नृत्य, गायन, वादन, अभिनय तसेच क्रीडा क्षेत्रात मल्लखांब, रनिंग, गोळा फेक, लांब उडी, उंच उडी, रिले, पोहणे यासारखे ललित कला व क्रीडा प्रकारांचेही शिक्षण अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांच्या माध्यमातून दिले जाते. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आत्मनिर्भर व स्वावलंबी होण्यासाठी यासारखे विविध उपक्रम नॅबमधील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविले जातात.

कुठल्याही अडचणींवर दोषांवर वेळेवर उपाय केल्यास लवकर बरे वाटते या उपचारांना यश मिळू शकते म्हणूनच शिक्षण तज्ञांच्या मते शैक्षणिक दोष असणाऱ्या दृष्टि बाधित्त प्रवर्गावर लवकर ओळखला जाऊन त्यांना जर पूरक उपचार पद्धतीने शिक्षण दिले गेले तर नक्कीच फायदा होईल जितक्या लवकर हे पूरक उपचार पद्धतीचे शिक्षण किंवा सप्लीमेंट्री रेमेडीयल त्यांना दिले जाईल तितके यश अधिक मिळते व जितक्या उशिरा या दोषांवर उपचार पद्धतीचे शिक्षण सुरू होते तितके दोष पूर्ण नाहीसे होण्याची शक्यता कमी होत जाते महाराष्ट्र राज्यातील दृष्टी बाधित व बहुविकलांग संवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणारी एकमेव संस्था म्हणजे नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड युनिट महाराष्ट्र म्हणजे नॅब संस्था शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक पुनर्वसनाच्या कामाची माहिती सर्व दूर व्हावी यासाठी नॅब संस्था पुढाकार घेऊन अंधकल्याणासाठी झटत आहे. नॅब युनिट महाराष्ट्र ही नॅबची प्रमुख राज्य शाखा असून नाशिक

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– I Jan – Feb, 2023

OPEN ACCESS Original Research Article

येथे आहे. नॅब राज्य शाखेच्या एकूण 18 जिल्हा शाखा असून उपकेंद्र विभाग गोंदिया, परभणी, हिंगोली, नांदेड एवढी उपकेंद्रे नॅब संस्थेची आहेत.

नॅब युनिट महाराष्ट्र नाशिक येथील राज्य शाखा राबित असलेले उपक्रम पुढील प्रमाणे

भावना चांडक फलोर महानॅब स्कूल फॉर द ब्लाइंड सातपूर, नाशिक

नॅब नॅब नाईस विजय मर्चंट मेमोरियल वर्कशॉप ट्रेनिंग सेंटर फॉर द ब्लाइंड

श्रीमती चंद्रभागाबाई नरसिंग दासजी चांडक बहु विकलांग केंद्र सातपूर नाशिक

यशवं तराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मान्यता प्राप्त बीएड विशेष शिक्षक प्रशिक्षण केंद्र

चारिटी सेंटर नाशिक

स्वतंत्र ब्रेल लिपीतील पुस्तकाची लायब्ररी

विशेष संगणक प्रशिक्षण केंद्र

संवेदना उद्यान

विशेष शिक्षक आरसीआय मान्यताप्राप्त डीएड दृष्टी बाधित पदविका प्रशिक्षण केंद्र.

अपंग व्यक्ती अधिनियम 1995 या कायद्यानुसार संस्था आपली उद्दिष्टे साध्य करण्याकरिता खालील उपाययोजना करीत आहे

1. अंधत्व येऊ नये म्हणून अंधत्व प्रतिबंध व लवकरात लवकर निदान करण्यासाठी आरोग्य विषयक सुविधांची उपलब्धता मिळवून देते न्याप संस्थेचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रभर 18 जिल्हा शाखा मार्फत विषयक
2. अंध विद्यार्थी यांना अठरा वर्षापर्यंत योग्य अशा वातावरणात मोफत शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देते . अंध विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आरक्षण शिष्यवृत्ती मोफत गणवेश व प्रकाश प्रवासासाठी सवलत संस्था मिळवून देते अंध व्यक्ती काम करू शकतील अशा योग्य पदांची निश्चिती व अशा पदांवर शासकीय व निम शासकीय सेवेत अंध अपंग व्यक्तींसाठी तीन टक्के आरक्षण मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे करते महिलांना उद्योग कारखाने स्वतःचे घर विशेष शाळा व खास मनोरंजन केंद्र उभारण्यासाठी मदत म्हणून सवलती मध्ये जमीन वाटप शासनामार्फत मिळवून देण्यास संस्था मदत करते अंधमहिलांचे शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसन या एकंदरीतच महिलांच्या दृष्टीने सामाजिक सुरक्षा ही मिळवून देते.
3. अंध व्यक्ती काम करू शकतील अशा सुयोग्य पदांची निश्चिती व अशा पदांवर शासकीय व निमशासकीय सेवेत अंध अपंग व्यक्तींसाठी तीन टक्के आरक्षण मिळवून देण्यासाठी संस्था प्रयत्न करते अंध महिलांना उद्योग कारखाने स्वतःचे घर विशेष शाळा व खास मनोरंजन केंद्र उभारण्यासाठी बांधण्यासाठी मदत म्हणून सवलतींमध्ये जमीन वाटप शासनामार्फत मिळवून देण्यास संस्था मदत करते अंध महिलांपैकी शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसन व एकंदरीत महिलांच्या दृष्टीने सामाजिक सुरक्षा ही मिळवून देते अंध महिलांसाठी असलेल्या विशेष सोयी सुविधा अथवा हक्कांपासून अंध महिलांना वंचित ठेवल्यास अशा अंध व्यक्ती आयुक्त अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– I Jan – Feb, 2023
OPEN ACCESS Original Research Article

यांच्या अभि मत न्यायालयात दाद मागू शकते त्यासाठी नॅब संस्था या महिलांच्या हक्क मिळवून देण्यासाठी तत्पर असते.

दृष्टि बाधित मुलींचे शिक्षण सर्वसामान्य मुलांप्रमाणे जीवनातील विविध प्रवाहात अंध मुलींनाही समावेशित करणे सहभागी करणे व अंधांच्या शिक्षणातील महत्त्वाचे तत्व समजले जाते कारण समाजाच्या या प्रभात निरनिराळ्या मिसळण्याच्या या सौख्याला अंधमुली व महिला पारख्या झालेल्या असतात. डोळस मुलींचे शिक्षण आणि अंध मुलींचे शिक्षण यात फारसे भिन्नत्व नाही परंतु शिक्षणात वापरण्यात येणारी साधने व पद्धती यात स्पष्टपणे भिन्नत्व दिसून येते शिक्षणाचे वेगळे तंत्र

डोळस मुलेमुली जेव्हा शाळेत दाखल होतात त्यावेळी आपल्याबरोबर मोठे अनुभवाचे विश्व बरोबर घेऊन येतात. डोळस मुले आणि शिक्षक यांच्यामध्ये समान अनुभवांचे फार मोठे भांडवल असल्यामुळे शिक्षक मुले यांच्यामध्ये मनमोकळा संबंध प्रस्थापित होऊ शकतो. डोळस मुलाला आपल्या सभोवतालच्या अनेक वस्तूंचे अनेक अनुभव नकळत येत असतात. त्यामुळे प्रत्येक सामान्य नाम उच्चारताच त्या पाठीमागचा समस्या आठवणी आणि अनुभव जागे होऊन मुलांच्या मनाचक्षूंपुढे एक प्रतीक उभे राहते. मुलांच्या बाबतीत ही प्रतीके बहुधा अस्तित्वातच नसतात, असलीत तर ती धुसर आणि गढूळ असतात. अंध मुलांच्या शिक्षणाची ही मोठी समस्या असते. त्यामुळे या मुलांना त्यांच्या मर्यादित शक्तीच्या द्वारा हक्क होईना पण भोवतालच्या जगाशी जास्तीत जास्त विचार करण्याची संधी आणि नवीन नवीन अनुभव मिळण्याची शक्यता आता करून दिली पाहिजे नॅब संस्थांतर्गत शाळांमध्ये या मुलांच्या अनुभवी विश्वाचा विस्तार वाढविला जातो त्यासाठीच नाशिक येथील सेंसरी गार्डन देखील आहे यामध्ये मुलांच्या कृतीयुक्त अध्ययन अध्यापन पद्धतीवर भर दिला जातो ब्रेल लिपी द्वारे अंधत्व प्राप्त मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले जात असले तरी मात्र इतर साधनांच्या बाबतीत खूपच मर्यादा येतात दृष्टि बाधितांचे अनुभव विश्वसमृद्ध करणे खऱ्या अर्थाने आव्हानात्मक काम आहे त्यांच्या मनात पटलावर प्रतीके निर्माण करणे खूपच कठीण कार्य आहे म्हणूनच अंधत्व प्राप्त मुलींच्या मुलांच्या शिक्षण शैक्षणिक समस्या शोधून त्यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे दृष्टी बाधितांसाठी समाज सरांना जाणीवपूर्वक व सामाजिक प्रामाणिक प्रयत्न होणे व त्यांचे समुपदेशन करून पुनर्वसन करण्याचे काम नॅब शाखा महाराष्ट्र ही संस्था अविरत पणे काम करीत आहे.

समारोप:

अंध प्रवर्गाला स्वावलंबनातून पुनर्वसन करण्यासाठी शालेय शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण देणे विशिष्ट व्यवसाय करून स्वबळावर आपली उपजीविका भागविण्याची प्रबळ भावना निर्माण करणे ही तेवढेच महत्त्वाचे आहे. अशा या दृष्टी बाधित प्रवर्गाच्या गरजेनुसार, क्षमतेनुसार व गतीनुसार शिकण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम नॅब सारखी संस्था अविरतपणे करीत आहे.

अशाप्रकारे नॅब संस्थेचा वटवृक्ष महाराष्ट्रभर बहरलाय. सृजनशील व साहसी संस्थांना दिशा आणि सीमा यांची मर्यादा नसते त्यांचे कर्तुत्व चौफेर उधळू शकते. त्याप्रमाणे संस्थेचे

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– I                Jan – Feb, 2023

OPEN ACCESS    Original Research Article

कार्य अंधजनांच्या कल्याणासाठी अविरत सुरूच आहे. दृष्टिबाधितांच्या जीवनात मोठी क्रांति करण्याचे श्रेय केवळ नॅब संस्थेला द्यावे लागेल. ही संस्था अंध बांधवांसाठी गेली 38 वर्षे भरीव असे कार्य करीत आहे संस्थेने समाजातील या दुर्लक्षित घटकांना अंधबंधू भगिनींना शिक्षण प्रवाहात आणले त्यांच्या जीवनात सामाजिक, आर्थिक क्रांती संस्थेमुळेच घडून आली आहे. त्यामुळे संस्थेतील लाभार्थींनी आता गगन भरारी घेतलेली आपल्याला दिसून येत आहे. नॅब संस्थेच्या या विविध उपक्रमांच्या दृष्टीबाधित प्रवर्गाच्या सर्वांगीण विकासावर सकारात्मक परिणाम झाला आहे त्यामुळे या प्रवर्गाने सामाजिक क्षेत्र, क्रीडा क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र, प्रशासकीय व शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटविलेला दिसतो. नॅब संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाची फलश्रुती पाहता आज अंधप्रवर्ग समाजाच्या मुख्य प्रवाहात राहून सन्मानाने स्वतंत्र जीवन जगत आहे म्हणजेच खऱ्या अर्थाने त्यांचे सक्षमीकरण झाले आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

संदर्भसूची:

मराठी पुस्तके

अभ्यासपूरक व अभ्यासे तर उपक्रमांच्या माध्यमातून दिले जाते, सुमन (2004) सामाजिक संशोधन पद्धती, विद्या प्रकाशन: नागपूर.

आठवले न. ल. (1960) बालकांचा मनोविकास, सुविचार प्रकाशन : नागपूर.

दुनाखे, अरविंद आणि देशपांडे, लीना (2005) प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, नित्य नूतन प्रकाशन: पुणे.

गोखले, शरदचंद्र (१९५४) नावडती मुलें, चित्रशाळा प्रकाशन: पुणे.

मोहनी, उषा (1961) अपंगत्वावर विजय, समाज प्रबोधन संस्था: पुणे.

काळे, प्रेमला (1990) अपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र, मॅजेस्टिक प्रकाशन: मुंबई.

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड युनिट महाराष्ट्र, वार्षिक अहवाल 1984 ते 2021

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड युनिट महाराष्ट्र, मार्गदर्शिका.

Vision, Newsletter of the National Association for the Blind Unit Maharashtra.

वेबसाईट:

- www.nabunitmaharashtra.org
- www.nabindia.org
- www.nabdelhi.in

**Cite This Article:**

* पाटील भ. आ. व ** प्राचार्य डॉ. बोरसे च. एम., *(2023). नॅशनल असोससएशन फॉर द ब्लाइंड युननट महाराष्ट्र या संस्थेच्या दृष्ट्बाधितांच्या पुनर्वसन कायावतील योगदानाचा अभ्यास,* ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XII (I) Jan-Feb, 66 -74.***